महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य,

मध्यवर्ती इमारत, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१.

इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०२६-२७

## जाहीर प्रकटन

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. राज्यातील एकूण ९५९४ कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. आत्तापर्यंत १२,५१,२५९ विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेत नोंदणी केली आहे.

दिनांक ०६/०६/२०२६ रोजी पासून नियमित दुस-या फेरीतील विद्यार्थी नोंदणी सुरु करण्यात आली आहे. यामध्ये विद्यार्थी नविन नोंदणी, प्रवेश अर्जाचा भाग-१ मधील दुरुस्ती आणि भाग-२ (कनिष्ठ महाविद्यालय पसंतीक्रम) दिनांक ०९/०६/२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वा. पर्यंत भरु शकतात. या फेरीमध्ये सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज अनलॉक करण्यात आल्याने सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश अर्ज लॉक करणे अनिवार्य आहे. आज दिनांक ०६/०६/२०२६ रोजी ५५,११७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

विद्यार्थी / पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी याची नोंद घ्यावी. या बाबीची व्यापक स्वरुपात प्रसिध्द देण्यात यावी. ही विनंती.

अधिकृत पोर्टल- https://mahafyjcadmissions.in

ई-मेल आयडी- support@mahafyjcadmissions.in

हेल्पलाईन नंबर- ८५३०९५५५६४.

MPalkar

(डॉ. महेश पालकर)

शिक्षण संचालक,

(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

स्थळ- पुणे.

दिनांक ०६/०६/२०२६.